महत्त्वाचे

पाईपलाईन रस्त्यावर घरफोडी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– घर बंद करून गावाकडे गेलेल्या कुटुंबाचे घर फोडून सोन्या- चांदीचे दागिने, रोकड असा २३ हजाराचा ऐवज चोरून नेला. पाईपलाईन रस्त्यावरील भारत गॅस गोडाऊन समोर, बरबडे वस्तीवर ही घटना घडली. याप्रकरणी तुषार मोहन सापते (वय २३) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात गुरूवारी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे सोमवारी (३ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता आपल्या कुटुंबासह शेतीच्या कामासाठी केळसांगवी (ता. आष्टी, जि. बीड) येथे गेले होते. त्यावेळी त्यांनी घराच्या दरवाजा कुलूप लावून बंद केला होता. दुसऱ्या दिवशी मंगळवारी (४ फेब्रुवारी) सकाळी ०८:३० वाजता फिर्यादी यांचे चुलत भाऊ गौतम रावसाहेब सापते यांनी फोन करून त्यांना माहिती दिली की, घराच्या दरवाजाचा कडी कोंडा लावलेला असला तरी दरवाजा उघडा आहे आणि घरातील सामान अस्ताव्यस्त पडले आहे. ही माहिती मिळताच फिर्यादी व त्यांची आई मंगल सापते तातडीने सकाळी १०:३० वाजता राहत्या घरी पोहोचले. त्यानंतर घरफोडीचा प्रकार लक्ष्यात आला. २० हजाराची रोकड, अर्धा ग्रॅम वजनाचे सोन्याचे गळ्यातील मणी व चांदीचा कमरपट्टा असा एकूण २३ हजार रूपये किंमतीचा ऐवज चोरीस गेला आहे.

महिलेला जीवे मारण्याची धमकी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– वादाची तक्रार पोलीस ठाण्यात केली तर तुझ्यासह पतीला व मुलांना जीवे मारून टाकीन अशी धमकी दिल्याप्रकरणी राळेगण म्हसोबा (ता. नगर) येथे राहणाऱ्या वैशाली नवनाथ खोटे (वय ३२) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून पोलिसांनी पठाण (पूर्ण नाव माहिती नाही, रा. राळेगण म्हसोबा) विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. गुरूवारी (६ फेब्रुवारी) सकाळी ७:३० वाजता, तक्रारदार व विरोधक यांच्यात वाद झाला. त्यानंतर सायंकाळी तक्रारदार यांनी आपल्या पतीला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, येथे आणले असता, पठाण हॉस्पिटलमध्ये आला आणि तक्रारदार यांना शिवीगाळ केली. तसेच, जर तक्रार केली, तर तुझ्या पतीला व मुलांना ठार मारीन, अशी धमकी दिली असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. अधिक तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव करत आहेत.

दुचाकीच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– वाळकी येथे झालेल्या दुचाकी अपघातात एका वृध्दाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. रोहिदास साहादु शेलार (वय ७० रा. वाळकी) असे मयत वृध्दाचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाऊसाहेब लक्ष्मण डोळसकर (वय ३५ रा. घारगाव) यांनी फिर्याद दिली आहे. कृष्णा हरिभाऊ भालसिंग (रा. वाळकी) असे गुन्हा दाखल झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे. बुधवारी रात्री १:३० च्या सुमारास नगर रस्त्याने वाळकी गावाकडे जाणाऱ्या दुचाकीच्या चालकाने पायी जाणाऱ्या रोहिदास शेलार यांना धडक दिली. ते गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

हद्दपारीचा भंग करणारा ताब्यात

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– हद्दपार आदेशाचा भंग करून शहरात फिरणाऱ्या गुन्हेगाराला तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलमान मेहबुब खान (वय ३० रा. घासगल्ली, कोठला) असे ताब्यात घेतलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. उपविभागीय दंडाधिकारी, नगर भाग, अहिल्यानगर यांनी सलमान मेहबुब खान याला दोन वर्षांसाठी अहिल्यानगर शहरातून हद्दपार केले आहे. मात्र, तो कोठल भागातील कुरेशी हॉटेल जवळील बापु शहा दर्ग्यासमोर उभा असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस अंमलदार डि. बी. जपे, अहमद इनामदार, वसिमखान पठाण, सतिष त्रिभुवन यांचे पथक तातडीने सदर ठिकाणी गेले असता त्यांना सलमान खान आढळून आला. त्याची ओळख पटवून त्याला ताब्यात घेतले. हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून शहरात सापडल्यामुळे त्याच्याविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मारहाण करत जीवे मारण्याची धमकी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– भिंगार उपनगरातील यशवंतनगर, डेअरी फार्म जवळ एका व्यक्तीला हॉकी स्टिकने मारहाण करण्यात आली व जीवे मारण्याची धमकी दिली. रोहीदास मुरलीधर साबळे (वय ४१, रा. यशवंतनगर, डेअरी फार्म, भिंगार) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडू पांडुरंग दिवटे (रा. यशवंतनगर, डेअरी फार्म, भिंगार) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. बदनामीकारक विधान केल्याने फिर्यादी खंडू दिवटे याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, त्याने शिवीगाळ करत लाकडी हॉकी स्टिकने डोक्यात व हातापायावर मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

विहिरीत पडल्याने तरूणाचा मृत्यू

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– दारूच्या नशेत घरा समोरील विहिरीत पडून तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना शेंडी (ता. नगर) शिवारात घडली. संजय रामभाऊ वाघ (वय ३० रा. शेंडी, ता. नगर) असे मयत तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास संजय वाघ हे दारूच्या नशेत असताना घरा समोरील विहिरीत पडले. त्यांना विहिरीतून बाहेर काढून त्यांचा भाऊ सुभाष वाघ यांनी त्यांना उपचारासाठी सिव्हील हॉस्पीटलमध्ये नेले, परंतु डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले. अधिक तपास पोलीस करत आहेत.

गोमांस विक्रेत्यांवर कारवाई

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– मुकुंदनगर भागात भिंगार कॅम्प पोलिसांनी गोमांस विक्रेत्यांवर कारवाई केली. दोघांविरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१५ अन्वये पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहसीन मुसा शेख (वय ३५, रा. हुसैनिया मस्जिद जवळ, बाराइमाम, कोठला, अहिल्यानगर) व अरिफ शब्बीर कुरेशी (रा. नालबंद खुंट, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. बुधवारी सकाळी १०.४५ वाजता, मुकुंदनगर भागात इनाम मस्जिदसमोरील एका गाळ्यात ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पी. ए. बारगजे, डी. व्ही. झरेकर आणि एम. जे. दाताळ यांनी ही कारवाई केली. कारवाई दरम्यान, नऊ हजाराचे ४५ किलो गोमांस, लोखंडी सत्तूर व चाकू तसेच लोखंडी तराजू व माप जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पी. ए. बारगजे करीत आहेत.

मालमत्ता कराच्या वसुलीसाठी महानगरपालिका आक्रमक

८ थकबाकीदारांवर कारवाई; गोडाऊन, गाळे सील, नळ कनेक्शनही तोडले

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देऊनही थकबाकीदार कर भरत नसल्याने महानगरपालिका प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेत कारवाई सुरू केली आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या सुमारे २२ लाखांच्या थकबाकीपोटी महानगरपालिकेने आठ मालमत्ता धारकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. १ गोडाऊन व ९ गाळे सील करत ९ नळ कनेक्शन तोडण्यात आले आहे.

प्रभाग समिती क्रमांक १ वार्ड क्रमांक ५३ मधील मालमत्ताधारक बबन लक्ष्मण फाटके यांच्याकडे मालमत्ताकराची ४ लाख ८६ हजार १२ रूपये थकबाकी असल्याने त्यांचे नळ कनेक्शन तोडण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक १ वार्ड क्रमांक ४३ मधील मालमत्ताधारक फकीर मोहम्मद नूर मोहम्मद बागवान यांच्याकडे मालमत्ताकराची ३ लाख ३५ हजार ५०२ रूपये थकबाकी असल्याने त्यांचे कमर्शियल चार गाळे सील करण्यात आले. तसेच ४ नळ कनेक्शन बंद करण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक १ वार्ड क्रमांक ४३ मधील मालमत्ताधारक देवकर यांच्याकडे मालमत्ता कराची १ लाख ६० हजार ६५४ रूपये थकबाकी असल्याने

त्यांचे नळ कनेक्शन तोडण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक १ वार्ड क्रमांक ५४ मधील मालमत्ताधारक याकूब साळवे भोग, कुमार वाघ यांच्याकडे मालमत्ता कराची १ लाख १६ हजार ७८९ रूपये थकबाकी असल्याने त्यांचा कमर्शियल गाळा सिल करण्यात आला.

तसेच, प्रभाग समिती क्रमांक ३ वार्ड क्रमांक ४ मधील सुशिलाबाई राजाराम पाथरकर यांच्याकडे ७९ हजार ५७५ रुपये थकबाकी असल्याने त्यांचे ४ गाळे सील करण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक २ वार्ड क्रमांक १७ मधील मालमत्ताधारक रखमाबाई यादवराव ठोंबरे यांच्या थकबाकीपोटी नळ कनेक्शन बंद करण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक ४ वार्ड क्रमांक ३० मध्ये ७४ हजार रूपये थकबाकी असल्याने नळ कनेक्शन बंद करण्यात आले. प्रभाग समिती क्रमांक १ वार्ड क्रमांक ४३ मधील मालमत्ता धारक मोहम्मद उस्मान महमूद मोहम्मद चमडेवाले यांच्याकडे मालमत्ता कराची ९ लाख ५७ हजार ८९४ रूपये थकबाकी आहे. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी गोडाऊन मधील भाडेकऱ्यास चमडे काढून घेण्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्यांनी प्रतिसाद न दिल्याने चमड्यासकट गोडाऊन सील करण्यात आले.

> महानगरपालिकेने शास्ती मध्ये १०० टक्के सवलत दिली आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत ही मुदत आहे. कोणत्याही परिस्थितीत जप्ती कारवाई थांबणार नाही. त्यामुळे थकबाकीदारांनी तत्काळ सवलत घेऊन थकीत कराचा भरणा करावा, अन्यथा जप्ती कारवाई केली जाईल.
>
> **– यशवंत डांगे,** आयुक्त तथा प्रशासक.

ट्रॅक्टरच्या वादातून तरुणाची रेल्वे पटरीवर आत्महत्या

दोन जणांविरूध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – केडगाव, शिवाजीनगर परिसरातील कृष्णा श्रीनाथ काळे (वय २९) या तरूणाने रेल्वे पटरीवर आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणात शरद रामचंद्र जाधव (रा. शिवाजीनगर, केडगाव) व त्याच्या सोबत असलेल्या एका इसमाने मानसिक त्रास दिल्याचा आरोप मृताच्या कुटुंबीयांनी केला असून, कोतवाली पोलिस ठाण्यात दोघांवर दाखल करण्यात आली आहे.

कृष्णाचे नातेवाईक सुनील राजेश कुऱ्हाडे (वय २८ रा. शिवाजीनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. कृष्णा काळे याने एक वर्षापूर्वी ट्रॅक्टर खरेदी केला होता. हा ट्रॅक्टर उपजीविकेसाठी वापरत असताना एप्रिल २०२४ मध्ये शरद जाधव याने शेतीकामासाठी तो भाड्याने घेतला. पुढे कृष्णाच्या साखरपुड्यासाठी मदत म्हणून शरदने ३० हजार रूपये त्याच्या आजी जनाबाई काळे यांना दिले होते. मात्र, काही महिन्यांपासून कृष्णाने ट्रॅक्टरची मागणी केली असता शरद वेळ काढू पणा करत होता. ३० जानेवारी २०२५ रोजी कृष्णा, फिर्यादी सुनील व राहुल धोत्रे हे जिकरी (ता. जामखेड) येथे ट्रॅक्टर आणण्यासाठी गेले असता, ट्रॅक्टर तेथे मिळाला नाही. शरदला फोन केला असता, मी रविवारी तुझ्या दारात ट्रॅक्टर आणून देतो, असे त्याने सांगितले. मात्र, रविवारीही ट्रॅक्टर परत न केल्याने कृष्णा व कुटुंबीय पुन्हा शरदच्या घरी गेले असता, ५० हजार रूपये दिल्याशिवाय ट्रॅक्टर परत मिळणार नाही, असा दम त्याने दिला.

दरम्यान, कृष्णाची आजी जनाबाई यांनी दागिने गहाण ठेवून ३० हजार रूपये जमा करून शरदला देण्यासाठी ४ फेब्रुवारी रोजी कायनेटिक चौकातील दर्पण चायनीज हॉटेल येथे गेले. मात्र, शरदने हे पैसे नाकारले व पूर्ण ५० हजार रूपये घेऊन ये, नाहीतर तू जीव देऊन टाक असा इशारा दिला. त्यावेळी शरदच्या सोबत असलेल्या दुसऱ्या व्यक्तीने देखील कृष्णाला रेल्वे पटरीवर जाऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. या घटनेमुळे निराश झालेल्या कृष्णाने मध्यरात्री रेल्वे पटरीवर जाऊन आत्महत्या केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील अधिक तपास करत आहेत.

उसने घेतलेल्या २२ लाखासह कारही बळकावली

मित्राने केला विश्वासघात; पोलिसात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – मित्रानेच विश्वासघात करून उसने घेतलेले २२ लाख रूपये आणि कार परत न केल्याने युवकाची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. कृतार्थ किशोर गुणवरे (वय १९, रा. कॉटेज कॉर्नर, सावेडी) असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे. त्यांनी गुरूवारी (६ फेब्रुवारी) सायंकाळी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वप्नील विजय खाडे (रा. भिस्तबाग चौक, सावेडी, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. कृतार्थ गुणवरे यांनी फिर्यादीत नमूद केले की, ते लँड डेव्हलपमेंट आणि रस्ता तयार करण्याच्या व्यवसायात आहेत. त्यांच्याकडे एक पॉकलँड मशीन असून त्यांच्या वडिलांनी दैनंदिन कामासाठी

आणि प्रवासासाठी कार (एमएच १६ सीई ५०५५) घेतली होती. कृतार्थच्या जवळचा मित्र स्वप्नील खाडे याने पैशाची गरज असल्याचे सांगून त्यांच्याकडून जुलै २०२४ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान ऑनलाइन आणि रोख स्वरूपात २२ लाख रूपये उसने घेतले. यानंतर २२ जानेवारी २०२५ रोजी स्वप्नील कृतार्थच्या घरी आला आणि बाहेरगावी जाऊन पैसे आणायचे आहेत, म्हणून दोन दिवसांसाठी कार मागितली. पैसे आणि कार दोन्ही परत देण्याचे आश्वासन देऊन तो कार घेऊन गेला. मात्र, अनेक दिवस उलटूनही पैसे व कार परत मिळाली नाही.

दरम्यान, कृतार्थ यांनी मित्र विकी काळे आणि ओम कजबे यांच्यासोबत २८ जानेवारी २०२५ रोजी स्वप्नीलच्या घरी जाऊन पैसे आणि कार मागितली. मात्र, स्वप्नीलने शिवीगाळ करून पुन्हा कार मागायला आल्यास हात-पाय तोडून घरी पाठवण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

दुकान फोडून ५५ टायरची चोरी

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – निंबळक बायपास रस्त्यावरील दत्त टायर दुकानासमोरून अज्ञात चोरट्यांनी ३५ हजार ५०० रूपयांचे ५५ टायर चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नंदू दिगंबर कदम (वय ३५, रा. मांजरसुंबा, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३१ जानेवारी रोजी रात्री ९ ते १ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दत्त टायरस दुकानासमोरील ट्रक व कारचे टायर चोरी केले. दुकानासमोरील टायर साखळीने लॉक करून ठेवले होते. मात्र, चोरट्यांनी साखळी तोडून टायर चोरून नेले. यामध्ये ट्रकचे २० टायर व कारचे वेगवेगळ्या साईजचे ३५ टायर असे एकुण ३५ हजार ५०० रूपये किंमतीचे ५५ टायर चोरून नेले. सदरचा प्रकार १ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता लक्ष्यात आला. मात्र कदम यांनी ६ फेब्रुवारी रोजी दुपारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस अंमलदार चौधरी करत आहेत.

डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर उत्साहात

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळदघाट अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत नांदगाव (ता. नगर) येथे संपन्न झाले. या शिबिरात ग्रामस्वच्छता, डिजिटल साक्षरता अभियान, वृक्षसंवर्धन, रक्तक्षय तपासणी, बालविवाह प्रतिबंध जनजागृती, गाव रस्ते व नदी दुरूस्ती, व्यक्तिमत्त्व विकास व्याख्यान, शेतीविषयक मार्गदर्शन आणि नवमतदार जनजागृती असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रा. डॉ. महाविरसिंग चौहान, डॉ. गोकुळदास गायकवाड, कृषिभूषण सुरशिंगराव पवार, गावाचे सरपंच सखाराम सरक, उपसरपंच नाथा सरक, ॲड. वैभव आघाव, कुस्तीपटू राजकुमार आघाव, कृषी सल्लागार डॉ. सतीश सोनवणे, तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे आदी उपस्थित होते. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. दांगडे यांनी शिबिरातील उपक्रमांची माहिती दिली. या सात दिवसांत श्रमदान, पथनाट्य, प्रभात फेरी, नवमतदार जनजागृती, डिजिटल साक्षरता अभियान यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. शिबिराच्या समारोपप्रसंगी डॉ. अशोकराव ढगे यांनी श्रमसंस्कार, राष्ट्रसेवा आणि युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद पाटील, तर आभार प्रदर्शन अभिजीत यादव यांनी केले.

जमिनीच्या वादातून दोन गटांत हाणामारी

परस्परविरोधी फिर्यादीवरून वांबोरीच्या चौघांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – शेतजमिनीच्या वादातून दोन गटांत मारहाण झाल्याची घटना शिंगवे नाईक शिवारात बुधवारी (५ फेब्रुवारी) सायंकाळी घडली. या घटनांमध्ये दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या असून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवले गेले आहेत.

रत्नमाला शरद साबळे (वय ३८, रा. वांबोरी, ता. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजी मुरलीधर साबळे (रा. वांबोरी) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतजमिनीतील सामाईक विहिरीजवळील स्टार्टर बोर्ड बॉक्स काढण्याच्या कारणावरून शिवाजीने फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांच्या पतीला लाकडी काठीने मारहाण करून दुखापत केली. माझ्या नादी लागलात तर बघून घेईन, अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

दुसऱ्या घटनेत शिवाजी मुरलीधर साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शरद मुरलीधर साबळे, गोविंद मुरलीधर साबळे, रत्नमाला शरद साबळे (सर्व रा. समर्थनगर, वांबोरी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतातील कंपाऊंडचा सिमेंट पोल कोणीतरी तोडल्याचे लक्षात येताच फिर्यादीने शरद साबळे आणि गोविंद साबळे यांना याबाबत विचारणा केली. यावरून वाद वाढत गेला आणि त्यांनी फिर्यादीला लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच रत्नमाला साबळे हिनेही मारहाण करत तुला संपवून टाकू अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दोन्ही गुन्ह्यांचा अधिक तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

हुंड्यासाठी दोन विवाहितांचा सासरी छळ

पीडितांच्या फिर्यादीवरून पोलिसात गुन्हे दाखल

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – दोन विवाहितांचा छळ केल्याच्या आरोपावरून त्यांच्या सासरच्या व्यक्तींविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भरोसा सेलकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर पीडितांनी कोतवाली व तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दाखल केल्या आहेत.

अहिल्यानगर शहरात राहणाऱ्या पीडित विवाहितेने दिलेल्या फिर्यादीवरून चौघांवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती विशाल विजय सुराणा, सासरे विजय दलिचंदजी सुराणा, सासु पुष्पा विजय सुराणा, दीर गिरीष विजय सुराणा (सर्व रा. तलाठी कार्यालया जवळ, वडगाव मावळ, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, एप्रिल २०२३ पासून १० जून २०२४ दरम्यान सासरच्या घरी त्यांच्यावर सतत शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. त्यांना मूलबाळ नसल्याबद्दल टोमणे मारण्यात आले, तसेच घरातील सर्व कष्टाची कामे जबरदस्तीने करवून घेतली जात होती. संशयित आरोपींनी हुंड्याची मागणी केली आणि मानसिक त्रास दिला, असे फिर्यादीत नमूद केले आहे.

सारसनगर परिसरात राहणाऱ्या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून पाच जणांविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती आकाश अशोक शिंदे, सासू सुनिता अशोक शिंदे, सासरे अशोक वसंत शिंदे, चुलत सासरे अनिल वसंत शिंदे आणि आजी सासू सुमन वसंत शिंदे (रा. गजराजनगर, वारूळवाडी, अहिल्यानगर) या पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ एप्रिल २०२३ ते ३ जुलै २०२३ या कालावधीत गजराजनगर, वारूळवाडी येथील सासरच्या घरी पीडितेवर वेळोवेळी मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. फिर्यादीला माहेरहून सोन्याची चैन आणण्यास सांगून तिला वारंवार त्रास दिला जात होता. तसेच किरकोळ कारणावरून शिवीगाळ, मारहाण व दमदाटी करून उपाशीपोटी ठेवले जात होते, असे फिर्यादीत नमूद केले आहे.

रा. प. निवृत्त कर्मचारी संघटनेच्या केंद्रीय सदस्यपदी कुबडे

जिल्हाध्यक्षपदी कोतकर

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना अहिल्यानगर विभागाची वार्षिक सभेत सेवानिवृत्तांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. टिळक रस्ता येथील श्रमिक कार्यालयाच्या सभागृहात विभागीय सचिव गोरख बेळगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीप्रसंगी सुनील कोल्हे, डी. जी. अकोलकर, राजेंद्र माने, बलभीम कुबडे आदींसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संघटनेचे मयत झालेल्या सभासदांना श्रध्दांजली वाहून बैठकीला प्रारंभ करण्यात आले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे याची राज्य केंद्रीय सदस्यपदी निवड झाल्यामुळे रिक्त असलेल्या जिल्हाध्यक्ष पदावर तारकपूर आगाराचे माजी वाहक गंगाधर कोतकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. वार्षिक हिशोब, सेवानिवृत पास पेन्शनबदल संघटनेचे सुरू असलेल्या कामाबाबत आढावा घेण्यात आला. कुबडे म्हणाले की, शंभर सभासदांची नोंदणी झाल्यामुळे राज्यात नगर विभागाचा तिसरा क्रमांक आल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. पुढील काळात सेवानिवृत्ती पास एक वर्षाचा व सर्व बसेसमध्ये त्याचा लाभ मिळण्यासाठी केंद्रीय सदस्यांच्या बैठकीत विषय मांडणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. सर्वांच्या सहकार्यामुळे केंद्रीय सदस्यपदी काम करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या माध्यमातून सेवानिवृत्तांच्या प्रश्नावर सुरू असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केला. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष कोतकर यांनी पुढील काळात सर्व पदाधिकारी यांना बरोबर घेऊन संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. अण्णासाहेब आंधळे यांनी प्रलंबीत प्रश्न सुटण्यासाठी व संघटना वाढीसाठी भावनिक आवाहन केले.